**नियमीत दिवाणी दावा क्र.४७६/२०१२ मधील निशाणी क्र.१२९ वरील आदेश**

( CNR : MHAH2500 1120 2012 )

वादीने सदरचा अर्ज दावा दुरुस्तीसाठी केलेला आहे. वादीने निशाणी क्र.१३० वर सदर अर्जाचे पुष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

२. प्रस्तुत अर्जामध्ये वादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुत दावा त्यांनी प्रतिवादींविरुध्द सरस निरस मानाने वाटपासाठी तसेच इतर तद्नुषंगिक दादींसाठी दाखल केलेला आहे. दावा दाखल करतेवेळी दाव्यातील दावा कलम १ मधील मिळकतीचे क्षेत्रामध्ये वादी व प्रतिवादी यांचे कुटूंबाचे क्षेत्र विभक्त करण्याचे नजरचुकीने राहुन गेले आहे. सदर दाव्यामध्ये वादी यांनी ७/१२ पत्रकी असलेले संपूर्ण क्षेत्र नमुद केलेले होते. परंतु कायदेशीररित्या वादी व प्रतिवादी यांचे कुटूंबाचे क्षेत्र वेगवेगळे नमुद करणे गरजेचे होते. त्यामुळे वादींनी दावा कलम १ मधील अनुक्रम क्र.३, ५, ६, ८, १३, १६, १८, २१, १२, २३, २४, २५ व २७ च्या क्षेत्राबाबत दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची आहे व त्यामुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही तसेच प्रतिवादींवर कोणतीही हार्डशीप होत नाही. सबब, वादींनी प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

३. प्रतिवादींना पुरेशी संधी देऊनही त्यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दिले नाही. सबब, प्रतिवादींचे म्हणणे नाही असा आदेश पारित करण्यात आला.

४. वादीचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्ती करता येईल. सदर आदेशामध्ये असे नमूद आहे की, '*दाव्यामध्ये पक्षकारांना त्यांच्या प्लीडींगमध्ये कधीही दुरुस्ती करता येईल, जर ती दुरुस्ती दोन्ही पक्षकारांमधील वादाचे निराकरण होण्यासाठी आवश्यक असेल.*' त्याच आदेशामध्ये '*दाव्याचा पुरावा चालू झाल्यानंतर दुरुस्ती करता येणार नाही*' असे नमूद केलेले आहे.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता व दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ च्या तरतुदी लक्षात घेता असे दिसुन येते की, सदर दाव्यामध्ये मुद्दे काढलेले

आहेत तसेच वादीचा पुरावा सुरु झालेला आहे. सदरचा दावा हा वाटप व इतर दादींसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये वादींनी मागितलेली दुरुस्ती ही दावा मिळकतीच्या क्षेत्राशी संबंधीत असुन वादींना दावा मिळकतींचे स्वतंत्र क्षेत्र दावा कलम १ मध्ये नमुद करावयाचे आहे. सदर दाव्यात मागणी केल्याप्रमाणे सरस निरस मानाने वाटप हे गुणदोषावर ठरविण्यासाठी सदरची दुरुस्ती आवश्यक आहे. वादींनी सदरची बाब दावा दाखल करताना नमूद करणे गरजेचे होते. परंतु सदर बाब नजरचुकीने दाव्यामध्ये नमुद करावयाचे राहून गेल्याची बाब लक्षात घेऊन दुरुस्तीस परवानगी देणे आवश्यक देणे.

७. वादींचे कथन विचारात घेता वादीने मागितलेली दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची आहे. सदर दुरुस्ती केल्यामुळे दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही. वादीने प्रस्तावित दुरुस्तीव्दारे केलेले कथन सिध्द करण्याची संपूर्ण जबाबदारी ही वादीवर असणार आहे. त्यामुळे प्रतिवादींना कोणतेही नुकसान होणार नाही. उलट प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्यामध्ये स्पष्टता येऊन दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. वादीने सदरचा दुरुस्तीचा अर्ज दावा दाखल झाल्यानंतर सुमारे दहा वर्षांनंतर दिला आहे. तसेच दावा पुराव्याच्या टप्प्यावर आहे. परंतु प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास पुरेशी संधी देऊनही म्हणणे दिले नाही. त्यामुळे अर्ज विनाखर्च मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी सदरची दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Digitally signed by SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Date: 2023.07.10 18:06:33 +0530

**( एस. सी. साळवी )**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**पारनेर**

**दि.१०.०७.२०२३**
**पारनेर**